# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.07.2024** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

१. विकसित भारताचं ध्येय साध्य करण्यामध्ये राज्य सरकारांची भूमिका महत्त्वाची असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,

२. राज्यातील नदी जोड प्रकल्प तातडीनं हाती घेण्याची पंतप्रधानांची सूचना

३. आरक्षणाबाबत सरकारनं सर्वांशी सुसंवादीच भूमिका ठेवावी – ज्येष्ठ नेते शरद पवार यांची अपेक्षा,

४. कोल्हापूरामधील पूर परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाला सुसज्ज राहण्याच्या सूचना, आणि

५. आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेत भारताची श्रीलंका विरुद्ध आज विजेतेपदासाठी लढत तर पुरुषांच्या सामन्यात श्री लंकेवर विजय.

**मोदी नीती आयोग**

विकसित भारत – 2047 हे प्रत्येक भारतीयचाचं ध्येय असून ते साध्य  करण्यासाठी राज्य सरकारं जनसहभाग वाढवून महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं आयोजित नीती आयोगाच्या नियामक परिषदेच्या नवव्या बैठकीमध्ये बोलत होते. राज्य सरकारं थेट जनतेशी जोडलेली असतात. विकसित राज्य सरकारांच्या माध्यमातूनच विकसित भारताचं  स्वप्न साकार होऊ शकतं, असंही पंतप्रधान म्हणाले. या वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य ‘विकसित भारत 2047’ असून त्याच्या ध्येय धोरणांच्या मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. हे दशक तंत्रज्ञानाचं आणि भू – राजकीय परिवर्तनाचं आहे, तसंच अनेक संधीचेही आहे. त्याचा जास्तीत जास्त लाभ आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढवत भारतानं करून घ्यायला हवा, असंही मोदी म्हणाले.  बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित, नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसंच सदस्य उपस्थित आहेत.

**नीती आयोग**
दरम्यान, देशामध्ये शून्य गरीबीचं उद्दिष्ट साध्य करण्याबरोबरच विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांबाबत नीती आयोग नियामक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. हे काम करताना आगामी काळातील आव्हानं आणि संधी याविषयी पंतप्रधानांनी मार्गदर्शन केलं, असं नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. आर. सुब्रमण्यम यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

**नदी जोड**
महाराष्ट्रातील नदी जोड प्रकल्प वेगानं हाती घेण्याच्या सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नवी दिल्ली इथं दिली. नीती आयोगाच्या बैठकीत त्यांनी हा मुद्दा मांडला होता. बैठकीत महाराष्ट्रातील नाशिक पुणे रेल्वेमार्ग, चिपळूण कराड, ठाणे मेट्रो, मुंबई फनेल झोन, समूह विकास यासारख्या महत्वाच्या पायाभूत आणि विकास कामांच्या प्रकल्पांबाबतचे मुद्दे आपण मांडले. हे प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी केंद्र सरकारनं सहकार्य करण्याची विनंती आपण पंतप्रधानांना केली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**पीयूष गोयल**
केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या 12 पैकी सर्वात मोठा औद्योगिक पार्क राज्यात रायगड जिल्ह्यातल्या दिघीत  होणार आहे. यासाठी गुंतवणूक दारांकडून सर्वाधिक विचारणा होत असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल मुंबईत दिली. केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यात सर्वात जास्त सहकारी संस्था असल्याने प्रस्तावित राष्ट्रीय सहकारी धोरणाचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला होईल, असंही त्यांनी सांगितलं.

**मन की बात**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता ‘मन की बात’ या कार्यक्रमाद्वारे देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 112 वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच newsonair.gov.in हे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲप वरून  थेट प्रसारित केला जाईल.

**शरद पवार**
आगामी विधानसभा निवडणुका संदर्भात महाविकास आघाडीमध्ये चर्चा झाली असून संसदेच्या अधिवेशनानंतर जागा वाटपासंबंधीची चर्चा पुढे जाईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. छत्रपती सं भाजी नगर  इथं त्यांनी काल पत्रकार परिषदेत ही

माहिती दिली. आरक्षणाबाबत सरकारनं सर्वांशी सुसंवादीच भूमिका ठेवावी, असं आपल्या पक्षाचं मत असल्याचं पवार म्हणाले.

**टिळक पुरस्कार**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आणि राज्यसभा सदस्य सुधा मूर्ती यांना यंदाच्या  लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. ही घोषणा लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे विश्वस्त डॉक्टर रोहित टिळक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केली. येत्या एक ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी दिनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आयोजित एका विशेष सोहळ्यात सुधा मूर्ती यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. लोकमान्य  यांच्या चार सुत्री स्वदेशी च्या अनुषंगानं त्यांनी मानवी आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हे लक्षात घेऊन मूर्ती यांची या पुरस्कारासाठी एकमतानं निवड करण्यात आली, असं टिळक यांनी सांगितलं.

**मुख्यमंत्री पूर**

कोल्हापूर जिल्ह्यातील पूर परिस्थिती लक्षात घेता बचाव कार्यासाठी प्रशासनानं सुसज्ज राहावं. आवश्यकता वाटल्यास एनडीआरएफची, एनडीआरएफच्या तुकड्या पाठविण्यात याव्यात, गरजेनुसार सेना दलाची मदत घ्यावी. त्याचबरोबर अलमट्टी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत कर्नाटक प्रशासनाशी समन्वय ठेवून नियोजन करावं, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिल्या. मुख्यमंत्र्यांनी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याशी चर्चा करुन माहिती घेतली आणि आपत्ती ग्रस्त लोकांना तातडीनं मदत उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, अतिवृष्टीमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील 10 राज्य मार्ग आणि 48 प्रमुख जिल्हा मार्ग असे 58 मार्ग बंद ठेवण्यात आले आहेत.

**समिती निवेदन**

सांगली- कोल्हापूर जिल्ह्यातला  महापूराचा धोका टाळण्यासाठी कर्नाटकातील अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा इथली पाणी पातळी नियंत्रित करण्याबाबत केंद्रीय जल आयोगाच्या निकषांप्रमाणे कार्यवाही करावी, असं आवाहन कृष्णा महापूर नियंत्रण नागरिक कृती समितीच्या वतीनं करण्यात आलं आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधला असल्याचं समितीचे कार्यकारी सदस्य आणि सेवानिवृत्त उप अभियंता विजय कुमार दिवाण यांनी सांगितलं.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्यात पुन्हा अधूनमधून मुसळधार सरी कोसळत आहेत. जिल्ह्यात  खेड मधली जगबुडी आणि राजा पुरातली कोंदवले या दोन नद्या अद्याप इशारा पातळीच्या वरुन वहात आहेत. सांगली

जिल्ह्यातील कृष्णा आणि वारणा नदी पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पूर परिस्थिती  उद्भवली असून अनेक ठिकाणी वाड्या वस्त्यांत  पाणी  शिरल्या मुळे  जिल्ह्यातील 4,100 नागरिकांचं सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आलं आहे. कर्नाळ रोडवरती तसंच कृष्णा घाट इथं एनडीआरएफची आणि भारतीय सेनेच्या पथकाकडून पाहणी करण्यात आली. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडून येणाऱ्या सूचनांचं पालन करावं, सतर्क राहावं, असं आवाहन पत्रकार परिषदेत सांगलीचे जिल्हाधिकारी डॉक्टर राजा दया निधी यांनी केलं. - धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यात तसेच शिंदखेडा तालुक्यातील बहुतांश भागात मध्यम स्वरुपाचा पाऊस होत आहे. त्यामुळे साक्री तालुक्यातील कान, जाम खेडी, बुरा ई या नद्यांना पूर आल्यानं मालगांव, जाम खेडी हे मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. - गडचिरोली जिल्ह्यात प्राण हिता, गोदावरी आणि इंद्रावती या नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यानं अहेरी, भामरागड आणि सिरोंचा तालुक्यांतील 27 मार्गांवरील वाहतूक बंद आहे.

**मदत केंद्र**

पुणे शहर आणि परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक नागरिकांच्या घरात पुराचं पाणी शिरल्याने कागदपत्र वाहून गेली असल्या नं त्यांना नवीन कागदपत्र तयार करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे 12 ठिकाणी मदत केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्तीदेखील करण्यात आली आहे, अशी माहिती पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिली आहे.

**ऑलिंपिक**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेच्या नेमबाजी प्रकारात भारताच्या मनू भाकर नं महिलांच्या 10 मीटर एअर पिस्टल गटात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नेम बाजीच्या 10 मीटर मिश्र एअर रायफल प्रकारासाठीच्या पदकांच्या शर्यतीतून मात्र भारतीय संघ बाहेर पडला आहे.

**क्रिकेट**

महिलांच्या वीस षटकांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि श्रीलंका यांच्यात श्री लंकेतील दंबूला इथं होणार आहे. पुरुषांच्या वीस षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतानं काल श्रीलंकेचा 43 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 213 धावा केल्या तर प्रत्युत्तरादाखल श्रीलंका संघ 170 धावा करू शकला. कर्णधार सूर्य कुमार यादव नं 58 तर ऋषभ पतनं 49 धावा केल्या. श्रीलंकाकडून नि सांकाने सर्वाधिक 79 धावा केल्या. भारताकडून रिया न परागने पाच धावा देत तीन बळी घेतले तर अर्षदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. सूर्य कुमार यादव याला सामनावीर पुरस्कारानं गौरवण्यात आले. मालिकेतील दुसरा सामना आज संध्याकाळी पल्ले केले इथं होणार आहे.

**हवामान**
कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**